मासिक
# सन्मार्गमित्र

**दर महिन्याच्या २५ तारखेला**
**प्रसिद्ध होणारे संस्थेचे मुखपत्र**

**वार्षिक वर्गणी**
**रुपये १००/-**

## अखिल ब्राह्मण
## मध्यवर्ती संस्था, नाशिक

जलशुद्धीकरण केंद्राशेजारी, हॉटेल सिबलजवळ,
त्र्यंबकरोड, नाशिक : ४२२००२.
फोन : ०२५३-२३१३५९९
website : admsanstha.org
email : admnsk@gmail.com
sanmargmitra2018@gmail.com

**संपादक**

**सुभाष सबनीस**

**प्रकाशक**

**उदयकुमार मुंगी**

**संपादन सहाय्य**

**अजित चिपळूणकर, ॲड. समीर जोशी**
**प्रा. लक्ष्मीकांत भट, सौ. अश्विनी पेशकार**

सन्मार्गमार्ग हे मासिक मालक अखिल ब्राह्मण मध्यवर्ती संस्था यांच्यासाठी प्रकाशक उदयकुमार दत्तात्रय मुंगी यांनी रिप्लिका प्रिंटर्स, २, चिटको सेंटर, वकीलवाडी, नाशिक येथे छापून अखिल ब्राह्मण मध्यवर्ती जलशुद्धीकरण केंद्राजवळ, त्र्यंबकरोड, नाशिक : ४२२००२ येथे प्रसिद्ध केला.

*(या अंकात प्रसिद्ध झालेल्या मजकुराशी संपादक आणि अ.ब्रा. म. सहमत असेलच असे नाही.)*

शुभदीपावली...

दिवाळी या एकाच शब्दात
जीवनाचं सारं मांगल्य सामावलंय जणू!
पणत्यांचं तेज, कंदिलाची शोभा
रांगोळ्यांचे सौंदर्य
आकाशातली रोषणाई
आणि मनामनातून उमलणारी
शुभेच्छांची फुलं...!
या साऱ्या आनंदात
ही दिवाळी
सौख्याने साजरी होऊ दे !



**अखिल ब्राह्मण**
**मध्यवर्ती संस्था, नाशिक**
सर्व कार्यकारिणी सदस्य व सभासद

# संपादकीय

# पुन्हा नव्याने...

**सोनेरी प्रकाशात पहाट सारी न्हाऊन निघाली ।**
**आनंदाची उधळण करीत आली दिवाळी आली ।।**
**नवे लेणे भरजारी दारी रांगोळी न्यारी ।**
**गंध उधळीत आली दिवाळी आली ।।**
**शुभ दीपावली**

***

दीपावली आपल्या मराठी मनाच्या मोठ्या आनंदाचा सण. गरीब असो वा श्रीमंत असो प्रत्येकजण हा सण आपपल्यापरीने या आनंदोत्सवात सहभागी होत असतो. २०१९ हे वर्ष स्वातंत्र्य मिळून ७२ वर्षे पूर्ण झाली, पण आपल्या भारतवर्षातील सर्व समाजाच्या सर्व समस्या सुटल्या असे आपल्याला म्हणता येणार नाही. प्रत्येक व्यक्तीनुसार समस्या वेगळ्या असतात. अनेक समस्या अशा आहेत की, त्या सोडवीत असताना अनंत अडचणी येत असतात आणि या अडचणींवर मात करता करता आपण जेरीस येतो.

सध्या आपण एका वेगळ्या परिवर्तनाच्या जंजाळात अडकलो आहोत. परिवर्तन होते आहे असे जाणवते अन् परिवर्तनाच्या भोवऱ्यातील गिरकी आपल्याला अगदी गरगरा फिरवते आहे असे आपल्याला वाटते असते. हे वाटत रहाणे म्हणजेच आपली आजची परिस्थिती आहे हे आपण समजून घेतले पाहिजे. प्रत्येकाला आपल्याकडे असलेला पैसा कसा सुरक्षित राहील याची चिंता लागून राहिली आहे. आपली नोकरी टिकेल की नाही याची चिंता भेडसावते आहे, आपल्या मुलांच्या भविष्याची चिंता तर कायमच सतावते. यांसारख्या अनेक प्रकारच्या चिंता आणि समस्या आपल्यापुढे ‘आ’ वासून उभ्या आहेत. रोज नवनवीन बातम्या, सोशल मीडियावरील चर्चा आणि अर्धवट माहितीच्या अधारावर होत असलेल्या चर्चा या गोष्टी अशाप्रकारच्या चिंता आणि भीती वाढवत आहेत. देशापुढे निर्माण झालेल्या खऱ्या समस्या सोडविण्यापेक्षा त्या समस्यांवरून सर्वसामान्यांचे लक्ष विचलित करण्याचे प्रयत्न तर होत नाहीत ना? हा प्रश्न मात्र सर्वसामान्य नागरिक आता विचारू लागले आहेत. नवनवीन आपल्याला पहायला मिळते, वाचायला मिळते, परंतु सर्वसामान्यांच्या परिस्थितीमध्ये फारसे नवे झाले आहे असे काही दिसत नाही. सुरुवातीला असलेला दुष्काळ, त्यानंतरची अतिवृष्टी आणि पूरस्थिती यामुळे निर्माण झालेली परिस्थिती, शेतकऱ्यांचे झालेले नुकसान, औद्योगिक क्षेत्रात निर्माण होवू पाहणारी अस्वस्थता ही वस्तुस्थिती असली तरी आपल्याला स्वत:लाच आलेल्या या परिस्थितीला तोंड द्यायचे आहे.

हे सर्व जरी खरे असले तरी आपण प्रत्येकाने आहे त्या परिस्थितीत गांभिर्याने व आपली ताकद जोखून वर्तन ठेवावे आणि आपल्या चिंता, काळजी याचे परिमार्जन आपल्यापरीने करण्याचा प्रयत्न करावा. कारण एवढेच आपल्या हातात आहे. या दीपावलीच्या निमित्ताने आपल्या आयुष्याला पुन्हा नव्याने पालवी फुटण्याची आशा बाळगून हा आनंदोत्सव साजरा करावा, याच सदिच्छा. येणारे वर्ष आपल्या सर्वांसाठी आनंदी व चिंतामुक्त परिस्थिती निर्माण करो अशी ईश्वरचरणी प्रार्थना. अखिल ब्राह्मण मध्यवर्ती संस्थेच्या सर्व सभासद व कार्यकारिणी सदस्य तसेच वाचकांना येणारे वर्ष सुखाचे, समाधानाचे आणि आयोग्यदायी जावो या हार्दिक शुभेच्छा...

**–सुभाष सबनीस**

# त्रिपुरारी पौर्णिमा

भारतीय संस्कृतीमध्ये अनेक सण आणि उत्सव साजरे केले जातात. या प्रत्येक सणामागे एक रूपक दडलेले आहे. हे रूपक शोधण्याची आज गरज आहे. हे रूपक मांडणारी एक सुंदर पुराणकथा किंवा लोककथा आहे. या पुराणकथा का निर्माण झाल्या आहेत याचाही विचार होण्याची गरज आहे. या कथांमधील तत्त्वे किंवा भान समजून घेण्याची आवश्यकता आहे. त्रिपुरारी पौर्णिमेलाही अशीच कथा आहे. त्रिपूर नावाचा एक असूर होता. प्रयागतीर्थाच्या ठिकाणी एक लाख वर्षे त्याने तपश्चर्या केली. तपश्चर्या केल्यानंतर ब्रह्मदेव त्याला प्रसन्न झाले आणि 'कोणताही वर माग', असे म्हणाले. त्यावर 'देवता, मनुष्य, निशाचर किंवा रोग यांच्यापासून आपल्याला अभय असावे', असा वर त्याने मागितला. याचाच अर्थ त्याला मरण नको होते. त्यावर ब्रह्मदेवाने त्याला 'तथास्तु' म्हटले. असा वर मिळाल्यानंतर मात्र त्या असुरातील उन्मत्तपणा वाढला.

या असुराची आकाश, संचारासह तीन पुरे होती. त्यामुळे त्याला त्रिपूर असे नाव देण्यात आले. मिळालेला वर हा कल्याणासाठी वापरायचा असतो; पण या असुराने तसे केले नाही. तो देवदेवतांसह साऱ्यांनाच त्रास द्यायला सुरुवात केली. त्याचा उपद्रव व्हायला लागला तेव्हा सर्व देवांनी शंकराला प्रार्थना केली. शंकराने त्याची तिन्ही पुरे जाळून टाकली आणि या राक्षसाचा नायनाट केला. हा दिवस 'कार्तिकी पौर्णिमे'चा होता. त्यामुळे कार्तिकी पौर्णिमेला त्रिपुरी पौर्णिमा किंवा त्रिपुरारी पौर्णिमा असे म्हणतात. या दिवशी प्रदोषकाळी शिवाने त्रिपूर राक्षस राजाचा वध करून देवदेवतांची त्रासातून सुटका केली. म्हणून हा दिवस त्रिपुरारी पौर्णिमा या नावाने हिंदू धर्मात साजरा करण्याची परंपरा सुरू झाली. त्रिपूर संहाराचा आनंद व्यक्त करण्यासाठी दीप पेटवून ही पौर्णिमा साजरी केली जाते. घरोघरी, शिवमंदिरातून आणि इतर देवालयांमधून दीपोत्सव साजरा करतात.

या दिवशी कार्तिकेय यांचे दर्शन घ्यावे, गंगास्नान करावे




आणि दीपदान करावे, असे शास्त्रात सांगण्यात आले आहे. मत्स्यावतारही याच दिवशी झाला. दुष्टांचा संहार याच दिवशी झाला म्हणून कार्तिक पौर्णिमेला आनंदोत्सव साजरा केला जातो. दिवाळीत दिव्यांची रोषणाई करून परिसर प्रकाशमान केला जातो, त्याचप्रमाणे त्रिपुरारी पौर्णिमेलाही मंदिरातील दीपमाळेवर दीप लावण्यात येतात. हा एक प्रकारचा आनंदोत्सवच आहे. ज्या ज्या वेळी असुरशक्ती वाढली त्या त्यावेळी दैवी शक्ती प्रकट होते आणि असूर प्रवृत्तीचा नायनाट करते, अशा प्रकारच्या कथा आपल्या संस्कृतीत आहेत. सज्जनांचे रक्षण करून दुष्टांचे निर्दालन करण्यासाठी दैवी शक्ती कशा उपयोगी असतात याचे चित्रण या कथांमधून दिसते. दुष्ट प्रवृत्तींचा नायनाट केल्याच्या आनंदाचा भाग म्हणून आपल्याकडे विविध उत्सव साजरे केले जातात.

पूर्वी प्रत्येक मंदिरासमोर एक दीपमाळ असायची. आताही जुन्या मंदिरांमधून ती दिसून येते. या दीपमाळेमध्ये वाती लावून त्या उजळल्या जातात. दुष्टांचा ऱ्हास कशा प्रकारे होतो याची आठवण राहावी म्हणून या दीपमाळा उजळल्या जातात. दिवाळीनंतर येणारी ही पौर्णिमा असते. या दिवशी देवस्थानातील दीपमाळा उजळतात त्याचप्रमाणे नदीच्या पात्रात प्रज्वलित दीप सोडण्याचीही प्रथा

आपल्याकडे आहे. 'त्रिपूरज्वलन व्रत' नावाचे व्रत या दिवशी करतात. शिवापुढे वाती लावणे, दीपपात्री दान करणे, शिवाची पूजा करणे असा या व्रताचा विधी शास्त्रात सांगितला आहे. कार्तिक पौर्णिमेला तुलसी विवाहाची समाप्ती होते. कार्तिक शुद्ध एकादशी ते पौर्णिमेपर्यंत पाच दिवस चालणाऱ्या तुलसी विवाहाची सांगता पौर्णिमेला होते. म्हणूनही दीपोत्सव साजरा केला जातो. उत्तर भारतात त्रिपुरारी पौर्णिमा 'स्कंद जयंती' म्हणून साजरी केली जाते. या दिवशी स्कंद मूर्ती देवतेची पूजा करणे, दीप पेटवणे आणि आनंदोत्सव साजरा करणे असे उत्सवाचे स्वरूप आहे. दक्षिण भारतातील राज्यांमध्ये त्रिपुरारी पौर्णिमेला 'कृतिका महोत्सव' साजरा करतात. या दिवशी भक्तगण शंकराची पूजा करतात, दीपदान करतात आणि अग्नी प्रज्वलित करून मोठ्या थाटाने हा उत्सव साजरा करतात.

मंदिरासमोरील उंच स्तंभावर दीपप्रज्वलन करणे हासुद्धा या महोत्सवाचाच एक भाग आहे. कार्तिक महिन्यातील शुक्ल पक्षात नरकासुर, त्रिपुरासूर आणि इतर राक्षसांचा देवादिकांनी वध केला. म्हणून दीपावलीपासून दीप प्रज्वलन करण्याची परंपरा आपल्याकडे सुरू झाली. त्याची सांगता त्रिपुरारी पौर्णिमेला होते. इतर राज्यांप्रमाणे गोव्यातही त्रिपुरारी पौर्णिमेचा उत्सव परंपरेनुसार केला जातो. मंदिरातील दीप मंदिराजवळच्या तळीच्या पाण्यात किंवा नदीकिनारी असलेल्या मंदिरातून नदीच्या प्रवाहात सोडणे, मंदिरातील देवदेवतांची विधिवत पूजा करून पालखीतून देवतांची मिरवणूक काढणे अशा प्रकारे तेथे हा उत्सव साजरा केला जातो. गोव्यातील साखळी येथील विठ्ठलापूर हे प्रति पंढरपूर समजले जाते. वाळवंटी नदीकिनारी पंढरपूर येथे कार्तिकी एकादशीला दीपदान करण्याची जी परंपरा आहे त्याचप्रमाणे येथेही ही परंपरा पाळली जाते. तेथे गेल्या ३० वर्षांपासून रंगवलेल्या होड्या नदीच्या पात्रात सोडण्याची परंपरा सुरू झाली. तेथे १५ वर्षांपूर्वी साखळी दीपोत्सव समिती स्थापन करण्यात आली. त्यामुळे त्रिपुरारी उत्सवाचे स्वरूप आता आणखी विकसित झाले आहे. या उत्सवाला आता राजकीय पातळीवरील उत्सव म्हणून मान्यता मिळाली आहे. या दिवशी घरात, देवळात दिवे लावावेत, असे सांगण्यात आले आहे. दीपावलीतील दीपोत्सवाप्रमाणेच आज दीपोत्सव साजरा केला जातो. आपल्या मनातील अंधार घालवून मनाची दीपज्योत प्रज्वलित करावी, असा या उत्सवांचा हेतू आहे. आपल्या मनाची सद्बुद्धी दीपज्योतीसारखी जागवा, असे या उत्सवांचे सांगणे आहे. आज समाजात भ्रष्टाचारासारखे भस्मासूर उभे ठाकले आहेत. हे असूर जाळून टाका, असे या उत्सवांतून आवाहन करण्यात आले आहे. समाजविरोधी मूल्यांचा नायनाट करा, हा यामागील यथार्थ आहे. आज अशा उत्सवातील रुपके बाजूला पडतात आणि त्यातील कर्मकांडच फक्त शिल्लक राहते. त्यामुळे त्रिपुरारी पौर्णिमेमागील रूपक आपण समजून घेण्याची आवश्यकता आहे.






भारतात साजऱ्या केल्या जाणाऱ्या सणांमध्ये सर्वात प्रसिद्ध आणि महत्त्वाचा उत्सव म्हणजे दिवाळी. भारतात सर्वधर्मीय लोक यात मोठ्या आनंदाने सहभागी होतात. असे म्हटले जाते की, दिवाळी रोषणाई, उल्हास, उत्सवाचा, प्रेमानी भरलेला, मैत्रीचा आणि मानवतेने भरलेला उत्सव आहे.

दिवाळी ही आश्विन महिन्याच्या शेवटी म्हणजे ऑक्टोबर किंवा नोव्हेंबरमध्ये मोठ्या उल्हासात साजरी केली जाते. आजकाल दिवाळी मोठ्या रंगीत माध्यमांनी साजरी होते. परंतु दिवाळीचे ऐतिहासिक महत्त्व लोक आजही जाणतात.

दरवर्षी दिवाळी अंधाऱ्या रात्रीत झगमगत्या दिव्यांनी व आकाशकंदील आणि फटाक्यांच्या रोषणाईने सणाच्या दिव्यतेचा अंदाज येतो. दिवाळीत संपूर्ण घराला सजवले जाते. घरी बनविलेल्या मिठायांचे आदान-प्रदान केले जाते. भारतात सर्व लोक घराला उजेडाने भरून टाकतात.

दिवाळीचा दिवस हा तोच दिवस मानला जातो ज्या दिवशी भगवान श्रीराम हे रावणाचा वध करून माता सीतासह अयोध्या नगरीत परतले होते. त्यांच्या स्वागतासाठी अयोध्यावासियांनी रोषणाई व दीप लावून मोठ्या आनंदात नटली होती.

असे म्हटले जाते की, शाही आदेशानुसारच श्रीराम व माता सीता यांचे अयोध्येपासून ते मिथीलापर्यंत संपूर्ण प्रदेश दिव्यांच्या रोषणाईने उजळून निघाला होता. अशा प्रकारे त्या अंधाऱ्या रात्रीला दिव्यांच्या प्रकाशाने उजळून टाकले होते. श्रीरामांचे स्वागत यासाठीही अधिक महत्त्वाचे होते. कारण श्रीराम १४ वर्षांचा वनवास भोगून आपल्या स्वराज्यात परत आले होते. त्यावेळी त्यांनी महामायावी दानव रावण याचा वध केला. यामुळे हे स्वागत फार उत्साहाचे, आनंदाचे होते. दिवाळीला आम्रपर्णाचे तोरण व झेंडूच्या फुलांचे तोरण मुख्य प्रवेशद्वारावर लावले जाते. अंगणात मुख्य प्रवेशद्वारासमोर वेगवेळ्या रंगांच्या रांगोळ्या काढल्या जातात, अशाप्रकारे येणाऱ्या पाहुण्यांचे स्वागत करतात. असे म्हटले जाते की रांगोळीला हिंदू धर्मात शुभकारक मानले जाते.

त्याबरोबर घरात चारही बाजूंना पणत्या एका रांगेत

ठेवून घर सजवले जाते. त्यामुळे दिवाळी दीपोत्सव म्हणून साजरी केली जाते. या दिवसांत अनेक जण नवीन वस्तू खरेदी करतात. मुख्यतः महिला सोन्याच्या दागिन्यांची खरेदी करतात. पारंपरिक रीती-पद्धतीने आणि तज्ज्ञांच्या मते या मुहूर्तावर नवीन वस्तू व सोने खरेदी करणे अत्यंत शुभ मानले जाते. त्यामुळे लोक सोने-चांदी खरेदी करतात. दिवाळी साजरी करण्यामागे जरी कोणतेही कारण असो; मात्र बाजारात या सणादरम्यान फारच उत्साहाचे वातावरण असते. दरवर्षी लोक मिठाई, कपडे आणि महत्त्वाच्या वस्तू तसेच आभूषणाच्या दुकानावर मोठी गर्दी करतात. दिवाळी भारतातील प्राचीन आणि सर्वात प्रसिद्ध सणांमधील एक आहे. हिंदू धर्मात दिवाळीला विशेष महत्त्व दिले आहे. दिवाळी या शब्दाचा अर्थ रोषणाईचा सण किंवा दीपोत्सव असा आहे. संस्कृतमध्ये दिवाळी शब्दास दीपावली असा अर्थ मानला जातो. याचा अर्थ दिव्यांची रांग असाही आहे. भारतात वेगवेगळ्या धर्माचे लोक आपल्या चालीरीतीप्रमाणे दिवाळी सण साजरा करतात. त्यामुळे या सणाला प्रत्येकाच्या घरी आनंद आणि उत्साहाचे वातावरण असते.



**दिवाळीचे पाच दिवस :**

पाच दिवस चालणारा हा उत्सव फारच मनोरंजक असतो. लोक एक-दोन आठवड्याआधीच दिवाळीची तयार सुरू करतात. यामध्ये घराची साफसफाई आणि रंगरंगोटीचा प्रामुख्याने समावेश होतो. कपडे आणि गरजेच्या वस्तूंची खरेदी केली जाते.

घरात आणि दुकानात फुलांनी आणि आंब्याच्या पानांच्या तोरणांनी सजवले जाते. आकाशकंदील घरासमोर लावले जातो. सुंदर रांगोळी काढली जाते. विविध रंगांनी ती सजवली जाते.

**धनत्रयोदशी :**

दिवाळीच्या पाच दिवसांनी सुरुवात ही धनत्रयोदशीने होते. या दिवशी लोक नवीन वस्तू आणि सोने-चांदी खरेदी करणे शुभ मानतात. घर दिव्यांनी सजवतात. धनाची देवी धन्वंतरीची पूजा करून अभिषेक केला जातो. असे म्हटले जाते की यादिवशी देवी धन्वंतरीचा जन्म दिवस पण असतो.

देवीची उपासना करून आपल्या परिवाराच्या स्वास्थ आणि समृद्धीची कामना केली जाते. बऱ्याच लोकांची अशी भावना आहे की, याच दिवशी देवी लक्ष्मी गृहप्रवेश करते. त्यामुळे दारिद्र्याचे पतन होते. सकारात्मक ऊर्जा घरात पसरली जाते.

**नरकचतुर्दशी :**

हा दिवस छोटी दिवाळी म्हणून जाणला जातो. हा दिवाळीचा दुसरा दिवस असतो. या दिवशी लोक घर रंगांनी सजवतात. महिला हातांवर मेहंदी काढतात. दिवाळीची संपूर्ण तयारीचा आढावा घेतला जातो. लहान मुलांना उपहार दिले जातात.

**दिवाली-लक्ष्मीपूजन :**

या पाच दिवसांतील सर्वात महत्त्वाचा दिवस, ज्याला आपण दिवाळी असेही म्हणतो. या दिवशी मोठ्या थाटामाटात आणि योग्य चालीरीती-रिवाजात माता लक्ष्मी,

श्री गणेश भगवान आणि माता सरस्वती यांची पूजा केली जाते. या देवीदेवतांना आमंत्रित केले जाते. घरात नेहमीसाठी वास करण्याचे आवाहन केले जाते. त्यासाठी दरवाजे-खिडक्या आणि व्हरांडा खुले/उघडे ठेवले जातात. तेथे सुंदर दिव्यांची सजावट व रांगोळी काढली जाते.

पूजा रीतिरिवाजाने पूर्ण झाल्यावर देवतांच्या आगमनांच्या जल्लोषाला फटाके फोडून द्विगुणीत केले जाते. गोड पदार्थ खावू घातले जातात. एकमेकांना दिवाळीच्या मंगलमय शुभकामना दिल्या जातात. या दिवशी व्यापारी व व्यावसायिक आपल्या दुकांनांमध्ये भगवान कुबेर आणि माता लक्ष्मीची पूजा करतात.

**पाडवा :**

दिवाळीचा चौथा दिवस हा पाडव्याचा असतो या दिवशी विवाहित एकमेकांना सुंदर उपहार देतात. आजही बरेच लोक भगवान श्रीकृष्णांची गोवर्धन पूजा करतात.

ग्रामीण भागात घरातील पशूंना विशेषतः गाई, बैल आणि म्हशी व बकऱ्यांना सजवून त्यांना दिवाळीचे मिष्ठान्न खाऊ घालतात.

**भाऊबीज :**

दिवाळीचा पाचवा दिवस हा भाऊ-बहिणीच्या अतूट आणि असीम प्रेमाच्या नात्याला जोपासण्याचा असतो. या





दिवशी बहिणी आपल्या भावाला मोठ्या आत्मीयतेने ओवाळून त्यांच्या समृद्धी व भरभराटीची शुभकामना करतात. भाऊ-बहिणीला छानशी भेटवस्तू देतात व आपल्या नात्याला अधिक मधुर बनवण्याचा प्रयत्न करतात. हा दिवस रक्षाबंधनाइतकाच पवित्र मानला जातो. विवाहित बहिणी माहेरी येतात. भारत हा असा देश आहे की, जेथे विविध जातीधर्माचे समुदाय एकसाथ, एका बंधनात राहतात आणि एकमेकाचे सण मोठ्या आनंदात साजरे करतात.

आजच्या धकाधकीच्या जीवनात लोक एकमेकांना कमी भेटतात, दिवाळी सण आपल्या प्रिय व्यक्तींना भेटण्याची आनंदमयी संधी घेऊन येते. लोक एकमेकांना शुभकामना देवून आणि भेटवस्तू, मिष्ठान्न देवून आपले नाते अधिक बळकट बनवतात. आजच्या काळात सर्व देशवासी पर्यावरणाला होत असलेल्या नुकसानाबाबत जागृत आहेत. त्यामुळे बरेच परिवार प्रदूषणरहित दिवाळी साजरी करतात. दिवाळीत हानिकारक फटके फोडले जात नाहीत. शाळा आणि इतर संस्थांमध्ये तसेच भारत सरकारही नागरिकांना प्रदूषणमुक्त दिवाळी साजरी करण्याची विनंती करतात.

चला तर मग आपणही येणारी दिवाळी प्रदूषणमुक्त साजरी करण्याचा संकल्प करूया आणि देशांच्या हितामध्ये आपलेही योगदान देवूया. हा आपला देश आहे, तो स्वच्छ व सुंदर ठेवणे आपणा सर्वांचीच जबाबदारी आहे. देशाला फक्त राष्ट्र न समजता आपले घर समजून त्यावर प्रेम करून त्याची काळजी घेतली पाहिजे. तरच उद्याचा भविष्यकाळ उज्ज्वल राहणार आहे.

# अखिल ब्राह्मण मध्यवर्ती संस्थेची निवडणूक बिनविरोध

**नाशिक :** संपूर्ण देश कार्यक्षेत्र असलेली अखिल ब्राह्मण मध्यवर्ती संस्था गेल्या अठ्ठेचाळीस वर्षांपासून सर्वशाखीय ब्राह्मण समाजासाठी कार्य करीत आहेत. संस्थेची त्रैवार्षिक निवडणूक सप्टेंबर २०१९ मध्ये बिनविरोध संपन्न झाली. संस्थेच्या जुन्नर येथील केंद्राच्या सभागृहात झालेल्या वार्षिक सर्वसाधारण सभेमध्ये निवडणूक निर्णय अधिकारी श्री. अनिल जोगळेकर यांनी संस्थेच्या निवडणुकीचा निकाल जाहीर केला.

संस्थेचे नवीन पदाधिकारी पुढीलप्रमाणे अध्यक्ष : ॲड. श्री. गणेश वसंत गोखले (पुणे), उपाध्यक्ष : ॲड. श्री. नागनाथ मोहन गोरवाडकर (नाशिक), श्री. चंद्रशेखर रामचंद्र जोशी (जुन्नर), कार्याध्यक्ष : श्री. उदयकुमार दत्तात्रय मुंगी (नाशिक), कार्यवाह : श्री. अजित मधुकर चिपळूणकर (नाशिक), कोषाध्यक्ष : ॲड. श्री. सतिश प्रभाकर बालटे (नाशिक), सहकार्यवाह : श्री. गंगाधर नारायण कुलकर्णी (नाशिक), आधारस्तंभ : श्री. पांडुरंग वासुदेव सावजी (नाशिक), देणगीदार : डॉ. श्री. सचिन सुरेश पाडेकर (नाशिक), आश्रयदाता : श्री. विनोद केशव कुलकर्णी (नाशिक), कार्यकारिणी सदस्य : श्री. सुभाष प्रभाकर सबनीस (नाशिक), श्री. उल्हास एकनाथ पंचाक्षरी (नाशिक), सौ. सुहासिनी संतोष बुरकुले (नाशिक), श्री. अविनाश प्रभाकर गानू (पुणे), श्री. सुहास यशवंत चोपडे (पुणे), श्री. विश्राम रघुनाथ देशपांडे (पुणे), सौ. शैला भालचंद्र गिजरे (पुणे), सौ. अपर्णा मकरंद मोडक (पुणे), श्री. मुकुंद गणेश बोकील (निरा), श्री. मधुकर चंद्रशेखर दाणी (फलटण), श्री. सुभाष शंभुराव कुलकर्णी (फलटण)

जुन्नर परिसरातील डोंगररांगांमध्ये आणि निसर्गरम्य ठिकाणी असलेल्या अष्टविनायकापैकी एक असलेल्या लेण्याद्रीच्या गिरिजात्मक गणेशाच्या पावनभूमीमध्ये संपन्न झालेली निवडणूक आणि वार्षिक सर्वसाधारण सभा खेळीमेळीच्या वातावरणात पार पडली.

याच सभेत नवीन पदाधिकाऱ्यांनी कार्यभार स्वीकारला. संस्थेच्या सर्व केंद्रांचे पदाधिकारी आणि सभासद मोठ्या संख्येने उपस्थित होते.

---

# पुणे केंद्राचे कार्यक्रम

**नाशिक :** पुणे केंद्राच्या वतीने दरवर्षीप्रमाणे यावर्षीदेखील खंडेनवमी पूजनाचा कार्यक्रम संस्थेच्या कार्यालयात सोमवार, दिनांक ७ ऑक्टोबर २०१९ रोजी सायंकाळी ६.३० वाजता सर्वांचे आदरणीय श्री. गोसावी काका यांच्या शुभहस्ते करण्यात आला. त्याचप्रमाणे मंगळवार दिनांक ८ ऑक्टोबर २०१९ रोजी सायंकाळी ४.३० वाजता निंबाळकर तालीम चौक येथे विजयादशमी व सीमोल्लंघनानिमित्त सोने वाटप व साखर वाटप करून सर्व नागरिकांना दसऱ्याच्या निमित्ताने शुभेच्छा देण्यात आल्या. त्याचप्रमाणे शनिवार, दिनांक १२ ऑक्टोबर २०१९ रोजी सायंकाळी ५.०० वाजता केसरी वाड्यातील लोकमान्य सभागृहात अखिल ब्राह्मण मध्यवर्ती संस्थेच्या पुणे केंद्र आणि ब्राह्मण सेवा संघ, पुणे आयोजित कोजागरी पौर्णिमेनिमित्त 'हे सूरांनो चंद्र व्हा' हा संगीतमय ककार्यक्रम आयोजित करण्यात आला होता.

सूरमणी निनाद शुक्ल, सुखदा जोशी, नेहा वैशंपायन यांनी सुरेख सादरीकरण केले. केंद्रप्रमुख मकरंद माणकीकर, उपकेंद्रप्रमुख सुजाता मवाळ यांच्या मार्गदर्शनाखाली सर्व केंद्र कार्यकारिणी व सभासद यांनी सहकार्य केले. या कार्यक्रमाला शहरातील बहुसंख्य नागरिक उपस्थित होते. दुग्धपानानंतर कार्यक्रम संपन्न झाला.

# संस्था कार्यालयात नवचंडी यागाचे आयोजन



**नाशिक : अखिल ब्राह्मण मध्यवर्ती संस्थेच्या कार्यालयात शारदीय नवरात्रोत्सवानिमित्त महाअष्टमीच्या दिवशी नवचंडी यागाचे आयोजन करण्यात आले. याप्रसंगी यागात सहभागी झालेले दाम्पत्य.**

**नाशिक :** अखिल ब्राह्मण मध्यवर्ती संस्था नाशिकच्या वतीने शारदीय नवरात्रोत्सवानिमित्त महाअष्टमीच्या दिवशी नवचंडी यागाचे आयोजन करण्यात आले होते. याप्रसंगी संस्थेचे कोषाध्यक्ष ॲड. श्री. व सौ. सतीश बाल्टे, पंचवटी केंद्र प्रमुख श्री. व सौ. प्रदीप भानुवंशे, श्री. व सौ. दामोदर आराधी, श्री व सौ. रमाकांत कुलकर्णी, श्री व सौ. अमित कुलकर्णी आदी यागाच्या हवनास बसले होते.

हे यजमान म्हणून पूजेला बसले होते. सकाळी नऊ वाजता पूजेला सुरुवात झाली. पुण्याहवाचन, अग्निप्रदीपन करून सप्तशतीहवन करण्यात आले. सायंकाळी सामुदायिक कुमारिका पूजनाच्या कार्यक्रमानंतर पूर्णाहुती झाली. त्यानंतर भोंडल्याचा कार्यक्रमात उपस्थित महिलांनी सहभाग घेऊन रंगत आणली. उपस्थित सर्वांनी महाप्रसादाचा लाभ घेतला. २००–२५० सभासद, भाविक यावेळी उपस्थित होते. कार्यक्रम यशस्वीपणे पार पाडण्यासाठी कार्याध्यक्ष उदयकुमार मुंगी, कार्यवाह अजित चिपळूणकर, सहकार्यवाह गंगाधर कुलकर्णी, कार्यकारिणी सदस्य श्री. पांडुरंग सावजी, श्री. उल्हास पंचाक्षरी, सौ.सुहासिनी बुरकुले यांनी विशेष प्रयत्न केले. यावेळी ॲड अविनाश भिडे, ॲड समीर जोशी, पंचवटी केंद्राचे चंद्रशेखर गायधनी, शेखर जोशी, संजय कुलकर्णी, सतीश करजगीकर, अनिल नांदुर्डीकर, तसेच संस्थेचे कार्यकारिणी सदस्य सचिन पाडेकर, सुभाष सबनीस हे उपस्थित होते. संस्थेच्या महिला सदस्य सौ. विजया म्हैसपूरकर, सौ. गायत्री चित्रगीमठ, सौ. सुजाता करजगीकर, श्रीमती जयश्री कुलकर्णी, सौ. शरयू मुंगी, सौ. सुप्रिया सबनीस आदी उपस्थित होते. वेदमूर्ती पराग कुलकर्णी आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी यागाचे पौरोहित्य अप्रतिम केले.

# पंचवटी केंद्रात विविध कार्यक्रम

**नाशिक :** परंपरा व संस्कृती यांचा मेळ घालत अखिल ब्राह्मण मध्यवर्ती संस्था पंचवटी केंद्रात सदोतीस नाविन्यपूर्ण उपक्रम राबविले जात असतात. नवरात्रीनिमिव केंद्राने कुंकूमार्चन आयोजित केले होते. त्यात महिलांनी आपला उत्स्फूर्त प्रतिसाद नोंदविला. कार्यक्रमाचे आयोजन गोरे राम मंदिरात करण्यात आले. वृषाली घोलप, सुचेता भानुवंशे, सुरेखा गायधनी, अनिता मुठे, सुचिता देशमुख यांनी कार्यक्रमाचे आयोजन व नियोजन केले.



याप्रसंगी चंद्रकांत गायधनी, प्रदीप भानुवंशे, उल्हास पंचाक्षरी, चंद्रशेखर जोशी उपस्थित होते.

नवरात्रीच्या निमित्ताने केंद्रात कुमारीका पूजन व भोंडला आयोजित केला होता. सदर कार्यक्रम गर्गेवाडा येथे संपन्न झाले. यात मुली व महिलांनी सहभाग घेतला. यासाठी पद्मा गर्गे, सुचेता भानुवंशे, वृषाली घोलप, सुरेखा गायधनी यांनी मेहनत घेतली. पंचवटी विभागातील अनेक समाजबांधवांनी एकत्रित करण्यासाठी केंद्रातर्फे प्रयत्न करण्यात येत आहेत.



त्याचाच एक भाग म्हणून केशव माधव मंगल कार्यालय (मेरी) येथे कोजागरी पौर्णिमेनिमित्त अभिजित प्रस्तुत सप्तसूर छेडिता या कार्यक्रम आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमात श्रोतृवर्ग चिंब भिजला होता. या कार्यक्रमाला पंचवटी परिसरातील साडेतीनशेच्या वर समाजबांधव उपस्थित होते. कार्यक्रमानंतर स्नेहभोजन व दुग्धपानाचा आस्वाद घेऊन कार्यक्रमाची सांगता झाली. यावेळी सतीश जोशी, चंद्रकांत गायधनी, उल्हास पंचाक्षरी, कौस्तुभ वाघमारे, अरुण जोशी, प्रशांत पाठक, संजय कुलकर्णी, दीपक जोशी, सुनीता जोशी, सौ. रेवती पाठक, सिद्धार्थ अत्रे, राकेश पाठक, सौ. सुरेखा गायधनी व सौ. वृषाली घोलप यांनी कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी प्रयत्न केले.

# आर्य चाणक्य ब्राह्मण एकता मंचतर्फे नवचंडी याग

**नाशिक :** आर्य चाणक्य ब्राह्मण एकता मंचचे श्री व सौ वसंतराव जोशी यांनी भूमिपूजन केले व श्री सचिन कुलकर्णी यांनी इंदिरानगर येथील मोदकेश्वर मंदिर येथे नवचंडी यागाचा नारळ वाढवून नवचंडीपूर्व पाठ वाचण्यास सुरुवात झाली.

शनिवारी सकाळी ६. ३० वाजता गुरुजी अभयशास्त्री भगरे व सहकारी यांच्या नेतृत्वाखाली नवचंडी यागास सुरुवात झाली. प्रत्येक यजमानांकडून इष्टदेवतांचे पुजन करुन त्यांनंतर कुंकुमार्चन होमहवन पुर्णाहुती वा महाआरती करण्यात आली. संध्याकाळी ५ वाजेपासून अनेक मान्यवर, समाजबांधव व परिसरातील नागरीकांनी उपस्थित राहून प्रसाद ग्रहण केला. नाशिकमधील ब्राह्मण संस्थांचे पदाधिकारी ॲड. श्री भानुदास शौचे (शुयमा), प्रा. दिलीप फडके (चित्तपावन संघ), ॲड. सतिश बालटे (अखिल मध्यवर्ती) तसेच कर सल्लागार श्री प्रमोद पुराणिक यांची विशेष उपस्थिती लाभली.

यजमानपदी श्री. व सौ. वैष्णव, श्री. व सौ. पराग पाटणकर, श्री. व सौ. महेश मालपाठक, श्री. व सौ. प्रसाद कुलकर्णी तसेच श्री. व सौ. चेतन पाठक व श्री. व सौ. सीमा प्रसाद देशपांडे यांनी सलग दुसऱ्या वर्षीही यजमानपदी बसून आई जगदंबेचे पूजन केले. यागाचे आयोजन आर्यचाणक्य ब्राह्मण एकता मंचाने केले होते



श्री मोदकेश्वर सेवा ट्रस्टने यागासाठी सहकार्य केले.

याग उत्तम रितीने संपन्न होण्यासाठी श्री. वसंतराव जोशी, सचिन कुलकर्णी, प्रवीण जोशी, रवी देवगावकर, विलास पाटणकर, हर्षद गोखले, पवन कंठे, महेश देशमुख, भूषण काळे, वैभव उपासनी, प्रणव भार्गव, मंगेश मालपाठक, विनायक गीत, भालचंद्र नाईक, हेमंत कुलकर्णी सीमा देशपांडे, सोनाली कुलकर्णी, स्नेहल काळे, प्राची नाईक, स्नेहल घारपुरे, विदुला अष्टेकर, तुषार लोणकर, विनोद पाठक यांनी विशेष परिश्रम घेतले. तसेच मंचच्या कार्यकर्त्यांचे सहकार्य लाभले श्री. अभयशास्त्री भगरे गुरुजी व इतर सहकाऱ्यांनी पौरोहित्य केले. सर्वांच्याच सहकार्याने धार्मिक कार्यक्रम संपन्न झाला.

नवचंडी याग खुपच सुंदर रितीने संपन्न झाला अशा प्रतिक्रिया उपस्थित भक्तांकडून मिळाल्याने आयोजकांचे मनोबल आणखी उंचावले.

---

## सौ. हर्षदा पाराशरे–औरंगाबादकर यांना पीएच.डी.



**नाशिक :** सौ. हर्षदा पाराशरे–औरंगाबादकर यांना कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाकडून वाणिज्य व व्यवस्थापन विषयात पीएच.डी. प्रदान करण्यात आली. त्यासाठी 'अ स्टडी ऑफ इम्पॅक्ट ऑफ टुरिझम ऑन द इकॉनॉमी ऑफ नाशिक डिस्ट्रिक्ट' या शीर्षकावरील प्रबंध विद्यापीठाला सादर केला. त्यासाठी त्यांनी विविध स्तरांतील १५०० संबंधितांना भेटून संशोधन केले. त्यांना डॉ. अनिल डोंगरे यांचे मार्गदर्शन लाभले. त्यांच्या या यशाबद्दल सर्वत्र अभिनंदन व कौतुक होत आहे.

## अखिल ब्राह्मण मध्यवर्ती संस्था नाशिक केंद्र, पुणे येथील नूतन कार्यकारिणी

केंद्र प्रमुख : श्री मकरंद नरहरी माणकीकर, उपकेंद्र प्रमुख । कोषाध्यक्ष : सौ. सुजाता सुहास मवाळ
कार्यवाह : श्री. मनोज सदाशिव तारे, सह–कोषाध्यक्ष : सौ. अनघा नारायण जोशी
सांस्कृतिक प्रमुख : श्री. विश्वनाथ भालेराव , देणगी प्रमुख: श्री. श्रीकांत चंद्रकांत जोशी
महिला प्रमुख/ वधु–वर प्रमुख : सौ. निता यशवंत पारखी, सह महिला प्रमुख/वधु–वर विभाग : सौ. सुवर्णा वासुदेव रिसबुड
शैक्षणिक विभाग : सौ. तृप्ती मनोज तारे, ज्येष्ठ नागरिक प्रमुख: श्री. उल्हास रामचंद्र पाठक
कार्यकारिणी सदस्य: श्री. मनोहर नागेश भांडारकर, श्री. भालचंद्र दत्तात्रय गिजरे,
सौ. सुनिता मोरेश्वर नांदुरकर,

## अखिल ब्राह्मण मध्यवर्ती संस्था नाशिक केंद्र, जुन्नरची नूतन कार्यकारिणी

केंद्र प्रमुख : श्री. हरीष शांताराम भवाळकर, उपकेंद्र प्रमुख : श्री. मुकुंद लक्ष्मण राक्षे,
कार्याध्यक्ष : सौ. छाया संजय जोशी, सचिव : श्री. नितीन अरुण गाजरे (जोशी),
खजिनदार : श्री. शशिकांत दिगंबर समुद्र प्रसिध्दी प्रमुख : श्री. जितेंद्र अनिल पुराणिक
सदस्य : श्री. मयुर दिपक कुलकर्णी, श्री. विवेक विजयानंद रांजणीकर, श्री. धनंजय अरुण जोगळेकर,
श्री. सुनिल सिताराम पांडे, श्री. संतोष मार्तंड कुलकर्णी, श्री. रुपेश गोकुळप्रसाद दुबे,
श्री. मंदार मधुकर भिडे, श्री. श्रीनिवास सिताराम भदे, श्री. सुहास रामकृष्ण जोशी,
श्रीमती वैशाली विलास संत, सौ. प्रांजली धनंजय कुलकर्णी, सौ. मंजिरी योगेश वैद्य,
सौ. शिल्पा विजय भिडे, सौ. दिप्ती अमरेंद्र कुलकर्णी, सौ. मनिषा अनिल जोशी,
संस्था प्रतिनिधी : श्री. चंद्रशेखर रामचंद्र गाजरे (जोशी), सल्लागार समिती : श्री. चंद्रशेखर रामचंद्र गाजरे (जोशी),
श्री. रामचंद्र सखाराम वैद्य, श्री. अनिल मोरेश्वर जोगळेकर,
श्री. सीताराम मधुसूदन कुलकर्णी, श्री. प्रमोद अनंत वैद्य

## अखिल ब्राह्मण मध्यवर्ती संस्था नाशिक केंद्र, पंचवटीची नूतन कार्यकारिणी

केंद्रप्रमुख : श्री. प्रदीप अंबादास भानुवंशे, उपकेंद्रप्रमुख : श्री. चंद्रशेखर अशोक जोशी
कार्यवाह : श्री. चंद्रशेखर गायधनी, सहकार्यवाह : श्री. संजय कुलकर्णी
कोषाध्यक्ष : श्री. निनाद जगन्नाथ पंचाक्षरी, महिला प्रतिनिधी : सौ. पद्मा गिरीश गर्गे

## वाढदिवस शुभचिंतन

**(१९ ऑक्टोबर)**
**सौ. अश्विनी पेशकार**
**(१२ नोव्हेंबर)**
**श्री. भालचंद्र कुलकर्णी**

# फराळ दिवाळीचा

सुनीता मिरासदार

दिवाळी फराळ म्हटले की खमंग कुरकुरीत चकली, शेव, चिवडा आठवतो. वर्षभर हे पदार्थ दुकानातून मिळतातच. पण दिवळीची सुट्टी, तऱ्हेतऱ्हेचा फराळ, नवीन फॅशनेबल कपडे, फटाके फुलबाजाची आतषबाजी, मित्रमंडळी, आप्तमंडळींच्या गाठीभेटी, जेवणावळी या सर्वांवर कळस म्हणजे आराम ! रोजची धावपळ कामाचा ताण, गडबड अजिबात नाही.

अशा निवांत दिवसात फराळाची सुबत्ता! लाडू, करंजी, चकली, चिवडा, शेव असे अनेक खाद्य पदार्थ घरात असतात. नेहमीच्या फराळाच्या पदार्थात थोडा बदल करून वेगळेपणा आणला तर आणखी आनंद! फराळाचे पदार्थ थोड्या वेगळ्या पद्धतीने करून पाहा! नक्की आवडतील.



**खमंग चकली भाजणी**

**साहित्य** :– चार वाट्या तांदूळ, एक वाटी उडीद डाळ, दोन वाट्या पंढरपुरी डाळे, एक वाटी जाड पोहे, दोन चमचे जीरे, दोन चमचे धने, एक चमचा मेथी दाणे.

**कृती** :– तांदूळ, उडीददाळ धुवून निथळत ठेवावेत. थोडे सुकल्यावर वेगवेगळे भाजावेत. पोहे, डाळे पण थोडे भाजावे. धणे, जिरे, मेथी दाणे भाजून सर्व एकत्र करून दळून आणावे, हे भाजणी पीठ दोन महिने चांगले टिकते. चार वाट्या भाजणी पिठात तिखट मीठ, तीळ, ओवा, तीन चमचे गरम तेलाचे मोहन घालून कोमट पाण्यात पिठ भिजवून चकली करावी. खमंग, खुसखुशीत चकली होते.

**चकली भाजणी प्रकार दोन**

**साहित्य** :– चार वाट्या ज्वारी, दोन वाट्या हरभराडाळ, दीड वाटी उडीद डाळ, एक वाटी मूगडाळ, एक वाटी धणे, दोन चमचे जिरे, एक चमचा मेथीदाणे.

**कृती** :– सर्व पदार्थ वेगवेगळे कोरडे खमंग भाजावेत. एकत्र करून दळून आणावेत. चार वाट्या भाजणी पिठात ७–८ हिरव्या मिरच्या, १५–२० लसूण पाकळ्या, एक चमचा तीळ, मीठ घालावे. अर्धी वाटी कोथिंबीर, हिरव्या मिरच्या, लसूण एकत्र करून मिक्सरमधून वाटून भाजणी पिठात घालावे. तीन चमचे गरम तेलाचे मोहन घालून कोमट पाण्याने पीठ भिजवावे. गरम तेलात मंद आचेवर चकली तळावी. मस्त चकली चवदार लागते.

**रव्याची कडबोळी**

**साहित्य** :– दोन वाट्या बारीक रवा, एक चमचा तिखट, एक चमचा जिरे, मीठ, हळद, १०–१२ कढीलिंब पाने, तेल.

**कृती** :– कढईत एक चमचा तेलावर कढीलिंब पाने घालून परतावीत. पाने चांगली कुरकुरीत परतावीत. रव्यात तिखट, मीठ, जिरे, हळद, तीन चमचे गरम तेलाचे मोहन आणि कढीलिंब पाने चांगली बारीक चुरून घालावीत. गरम पाण्यात रवा भिजवून ठेवावा. अर्धा तास झाकून ठेवावा. नंतर तेलाचा हात लावून पीठ चांगले मळावे.

कडबोळी वळावीत. गरम तेलात मंद गॅसवर तांबूस रंगावर तळावीत. खुशखुशीत होतात. लोणी, चटणी बरोबर छान लागतात. ५/६ दिवस चांगली राहतात.

**शक्तीवर्धक चवदार लाडू**

**साहित्य** :- अर्धाकिलो बिया काढलेला खजूर, एक वाटी शेंगादाणे कूट, राजगिरा पीठ अर्धी वाटी, एक चमचा वेलची पूड, एक वाटी राजगिरा लाही, तूप.

**कृती** :- एक चमचा तुपावर खजूर घालून थोडा भाजावा. थंड झाल्यावर खजूर मिक्सरमधून जाडसर वाटावा. खजूरात शेंगदाणे कूट, वेलची पूड, राजगिरा पीठ, पाव वाटी राजगिऱ्याच्या लाह्या घालून सर्व मिसळावे. मिश्रण कोरडे वाटल्यास तुपाचा हात लावून मऊ करावे. दोन चमचे पिठीसारखर घालून मळून लाडू वळावेत. तया लाडू राजगिऱ्याच्या लाह्यात घोळावेत. मिश्रण ताटात थापून वड्या कापता येतात.

**मोती पुलाव**

**साहित्य** :- दोन वाट्या बासमती तांदूळ, दोन सफरचंद, १५-२० काळी द्राक्षे, एक पिकलेले केळ, ८-१० चे तुकडे, चमचाभर बेदाणे, चमचाभर चारोळ्या, १०० ग्रॅ. पनीरचे तुकडे, अर्धी वाटी साखर, ७-८ लवंगा, चमचाभर वेलदोडे पूड, पाव चमचा केशरी रंग, तूप.

**कृती** :- तांदूळ धुवून ठेवावेत. सफरचंदाची साल काढून फोडी कराव्यात. केळीच्या चकत्या कराव्यात. सफरचंद, द्राक्षे, पनीर, चारोळ्या, बेदाणे एकत्र करून ठेवावेत. पातेलीत दोन चमचे तुपाची घालून फोडणी करावी. तांदूळ फोडणीत घालून दोन मिनिटे परतावेत. दोन वाट्या गरम पाणी, केशरी रंग घालून भात मऊ, मोकळा शिजवा. वरून दोन चमचे तूप सोडावे. साखर घालून हलवावे. झाकण टाकून वाफ काढावी. वेलची पूड घालावी. गरम भात वाढताना वरून सफरचंद, द्राक्षे, पनीर, चारोळ्याचे मिश्रण पसरावे. कडेने केळीच्या चकत्या लावाव्यात. सजवलेला मोती पुलाव दिवाळी पाडव्याला करावा.

**मक्याच्या कणसाची बर्फी**

**साहित्य** :- चार मक्याची कोवळी कणसे, अर्धी वाटी नारळचव, दोन चमचे खवा, दीड वाटी साखर, एक वाटी दूध, दोन चमचे पिठीसारखर, एक चमचा वेलदोडे पूड, अर्धा चमचा जायफळ पूड, तूप, बेदाणे, काजू, बदाम काप.

**कृती** :- मक्याची कणसे किसावीत. किसात दूध घालून शिजवावे. एक चमचा तुपावर नारळचव परतावा. त्यातच खवा मोकळा करून घालावा. साखरेत थोडे पाणी घालून घट्टसर पाक करावा. पाकात मकाकीस, नारळचव, खवा घालून चांगले घोटावे. वेलदोडे, जायफळ पूड घालावी. मिश्रण घट्ट झाले की खाली उतरवून चांगले घोटावे. पिठीसाखर घालून घोटावे. ताटाला तुपाचा हात लावून मिश्रण घालून थापावे. वरून सुका मेवा घालावा. दाबावे. चौकोनी वड्या कापाव्यात. वडी चवदार लागते.

***


## जाहिरात दरपत्रक

| प्रकार | आकार | दरमहा | वार्षिक |
|---|---|---|---|
| रंगीत | पूर्णपान १९x२५ सेमी | ५०००.०० | ५००००.०० |
| | अर्धपान १९x१२ सेमी | २५००.०० | २५०००.०० |
| | पावपान ९x१४ सेमी | १५००.०० | १५०००.०० |
| कृष्णधवल | पूर्णपान १९x२५ सेमी | २५००.०० | २५०००.०० |
| | अर्धपान १९x१२ सेमी | १५००.०० | १५०००.०० |
| | पावपान ९x१४ सेमी | १०००.०० | १००००.०० |
| शुभेच्छा | पावपान १९x२ सेमी | ५००.०० (कृष्णधवल) | |

## सूचना

जाहिरातीचे आर्टवर्क 'सीडीआर' किंवा 'पीडीएफ' फॉर्मेटमध्ये संस्थेचा मेल आयडी sanmargmitra2018 @gmail.com वर पाठविणे किंवा समक्ष संस्थेच्या कार्यालयात आणून देणे.

# विघ्नहर्ता
# वधु-वर
# सहायक मंडळ



संस्थेच्या वतीने सर्वसमावेशक अशी विघ्नहर्ता विवाह मंडळ या नावाने एक अतिशय उत्कृष्ट अशी वेबसाईट तयार करण्यात आली आहे. या वेबसाईटच्या सहाय्याने कोणत्याही जाती–धर्माचे लोक अनुरूप असे वधु–वर संशोधन करू शकतील. या वेबसाईटचे वैशिष्ट्य असे आहे की, आपण अगदी मोबाईलवरसुद्धा या वेबसाईटचा वापर करू शकता. या वेबसाईटवर आपले नाव नोंदणी करण्यासाठी आवश्यक असणारी फीसुद्धा आपण मोबाईलच्या माध्यमातून भरू शकता. अशा सर्व सोयीनी युक्त अशा मराठी व इंग्रजी भाषेची सोय असलेली ही वेबसाईट प्रत्येकासाठी उपयोगी ठरणार आहे. ज्यांची नोंदणी करावयाची असेल त्याचे **आधारकार्ड** या ठिकाणी आपणास पाहावयास मिळेल. म्हणजेच या वेबसाईटवर नोंदणी झालेल्या इच्छुकांची माहिती आपल्याला तपासून पाहाणे सोयीचे होईल. अशी सोय असलेली ही पहिलीच वेबसाईट असावी. सर्व सभासद तसेच सर्व जाती–धर्माच्या नागरिकांना आवाहन करण्यात येते की, प्रत्येकाने या वेबसाईटला भेट द्यावी व आपल्याला आवश्यक ती माहिती भरून वधु–वर संशोधन करावे ही नम्र विनंती.

वेबसाईट **www.abms.vignhartamatrimoni.com**

या वेबसाईटला भेट दिल्यानंतर आपल्याला ही वेबसाईट वापरण्यास किती सोपी व स्वस्त आहे ते समजेल. प्रत्येकाने एकवेळ या वेबसाईटला अवश्य भेट द्यावी ही विनंती.

***अखिल ब्राह्मण मध्यवर्ती संस्था व समाज सहाय्यक संस्था, नाशिक संचलित***

**विघ्नहर्ता वधु–वर सहाय्यक मंडळ : vighnahartamatrimony.com**

ही वेबसाईट सर्व जाती–धर्मियांच्या वधु–वरांकरिता सुरू करण्यात आली असून इच्छुकांनी याचा लाभ घ्यावा, असे आवाहन संस्थेमार्फत करण्यात येत आहे.

## ऑफलाईन नाव नोंदणीसाठी संपर्क

नाशिक : ०२५३–२३१३५९९

नाशिक (पंचवटी) : ७९७२२४२१६५

पुणे : ०२०–२४४३६९२२

जुन्नर : ९९७५६०३७७६

फलटण : ९८६०७२८६९८/९४२१८८१५६३


निरा (पुरंदर) : ९८२३३२६६८४

## वेबसाईटवर नोंदणी फक्त ऑनलाईनच करता येणार असून त्याचे दर खालीलप्रमाणे

- ३ महिन्यांकरिता : १०००/–
- ६ महिन्यांकरिता : २०००/–
- १ वर्षासाठी : ३०००/–
- १ वर्षानंतर नूतनीकरणास : १०००/–



## ‘सन्मार्ग मित्र’ लेखन पाठविण्याकरिता सूचना



१. राजकिय विषय सोडून कोणत्याही प्रकारचे लिखाण पाठवावे.
२. लिखाण कागदाच्या एका बाजूस सुवाच्च अक्षरात लिहिलेले अथवा टाईप केलेले असावे.
३. ब्राह्मण समाजातील विविध संस्था कार्यरत आहेत. त्यांनी आपआपल्या संस्थांच्या कार्यक्रमाचे वृत्तांत मुद्देसुद पाठविल्यास त्या लिखाणाला प्राधान्य देण्यात येईल.
४. प्रत्येक महिन्याच्या १५ तारखेपर्यंयत लिखाण संस्थेच्या कार्यालयात पोहोचेल या बेताने ते पाठवावे.
५. मासिकाच्या ध्येय धोरणाला अनुसरुन लिखाणामध्ये आवश्यक तो बदल करण्याचा अधिकार संपादकांनी राखून ठेवला आहे.
६. लिखाण स्वीकृत अगर अस्वीकृत करणे संपादकांच्या अधिकारात राहिल. अग्राह्य लिखाणास कारण देण्याचे बंधन संपादकांवर नाही. तसेच लिखाणास कोणतेही मानधन दिले जाणार नाही.
७. मासिकात व्यक्त होणाऱ्या मतांशी संस्था किंवा संपादक सहमत असतीलच असे नाही.

## विनम्र आवाहन

१. संस्थेच्या सर्व सभासदांनी आपला बदललेला अथवा नवीन पत्ता, फोन नंबर, मेल आयडी इत्यादी संस्था कार्यालयात येऊन अथवा पत्राद्वारे अपडेट करावा ही विनंती.
२. ब्राह्मण समाजातील सर्व जाती, पोट जातीच्या समाजबांधवांनी अखिल ब्राह्मण मध्यवर्ती संस्थेचे सभासद व्हावे ही नम्र विनंती. (आजीव सभासद वर्गणी रु. ५०१/– मात्र) सभासदत्वाचा अर्ज संस्थेच्या कार्यालयात उपलब्ध असून आपले ओळखपत्र, निवासाचा पत्ता व एक फोटोसह विहीत नमुन्यातील अर्ज कार्यालयात भरून द्यावा.

## संस्थेची केंद्र कार्यालये

### अखिल ब्राह्मण मध्यवर्ती संस्था, नाशिक केंद्र

केंद्र प्रमुख : श्री. महेश शुक्ल, मो. : ९८८११२४१४४
जलशुद्धीकरण केंद्राशेजारी, हॉटेल सिबल जवळ, त्र्यंबकरोड,
नाशिक – ४२२ ००२. फोन : २५७२३२६

### अखिल ब्राह्मण मध्यवर्ती संस्था, पंचवटी, नाशिक

केंद्र प्रमुख : श्री. प्रदिप भानुवंशे मो. : ७९७२२४२१६५
घर नं. ४४७७, भानुवंशे वाडा, भोंडे गल्ली, कपालेश्वर
मंदिरामागे, पंचवटी, नाशिक – ४२२ ००३

### अखिल ब्राह्मण मध्यवर्ती संस्था, पुणे केंद्र

प्रभारी केंद्र प्रमुख : ॲड. गणेश गोखले
‘कौशिक’, १२९३, सदाशिव पेठ, पुणे –३०.
फो : ०२०–२४४३६९२२

### अखिल ब्राह्मण मध्यवर्ती संस्था, जुन्नर केंद्र

केंद्र प्रमुख : श्री. रामचंद्र वैद्य
मो. : ९९७५६०३७७६
बेलवलकर सभागृह, बुधवार पेठ, जुन्नर, जि. पुणे

### अखिल ब्राह्मण मध्यवर्ती संस्था, नीरा केंद्र

केंद्र प्रमुख : श्री. दत्तात्रय त्रिंबक बडबडे. मो. : ९८२३३२६६८४
समर्थ बंगला, बाजार तळ, मराठी शाळे मागे,
नीरा, ता. पुरंदर जि. पुणे

### अखिल ब्राह्मण मध्यवर्ती संस्था, फलटण केंद्र

केंद्र प्रमुख : श्री. भालचंद्र दत्तात्रय ताथवडकर.
मो. : ९८६०७२८६९८.
११८, कसबा पेठ, फलटण, जि. सातारा

### अखिल ब्राह्मण मध्यवर्ती संस्था, शिरवळ केंद्र

केंद्र प्रमुख : ॲड. अमृत बाळकृष्ण मोने. मो. : ९८६०५ ४०९८६ । शिरवळ, ता. खंडाळा, जि. सातारा.